**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला**

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in

---

**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि ९६ /2020** **दिनांक: २३ / 03 /2020**

---

## *कोव्हीड- १९ आदेश*

**उद्योग व कारखाने , तत्सम आस्थापना दिनांक २३.३.२०२० पासून दिनांक ३१.३.२०२० पर्यंत बंद ठेवणे बाबत.**

**वाचा -**
1. **आपत्ती व्यवस्थापन कायदा -२००५**
2. **महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक १४ मार्च, २०२०**
3. **साथरोग अधिनियम,१८९७**
4. **सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक १४ मार्च २०२०**
5. **महाराष्ट्र पोलीस अधिनियम -१९५१**

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात **साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड - १९ कोरोना विषाणू वर उपाययोजना **नियम-२०२०** नुसार दिनांक १४ मार्च २०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील **नियम क्र. ३** नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** अकोला जिल्हयात अनेक औद्योगीक संस्था, कारखाने, उद्योग धंदे व तत्सम व्यवसाय सुरु आहेत. सदर संबंधीत आस्थापनेवरील अकोला जिल्हयातील विविध ठिकाणावरुन तसेच अकोला जिल्हयाबाहेरुन देखील कामगार / कर्मचारी वाहतूक करणा-या व्यक्ती येत असतात. यामूळे कोरोना विषाणूचा संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता, त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होवू न देता उपाययोजना राबविणे आवश्कय आहे. आणि. संबंधीत औद्योगीक आस्थापनेच्या ठिकाणी होणा-या गर्दीमुळे आपत्तीजन्य परिस्थिती अकोला जिल्हयात उद्भवू नये या करिता पूर्व तयारी करणे बाबत माझी खात्री झाली आहे.

**त्या अर्थी,** मी, **जितेंद्र पापळकर,**भाप्रसे **जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला , आपत्ती व्यवस्थापन कायदा- २००५ , साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** व महाराष्ट्र शासनाची अधिसूचना दिनांक १४ मार्च २०२० व मुंबई पोलीस अधिनियम -१९५१ चे कलम ४३ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार **अकोला जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व फैलाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा भाग म्हणून अकोला जिल्यातील सर्व उद्योग व कारखाने ,**



NitinN 101

तत्सम आस्थापना दिनांक २३.३.२०२० पासून दिनांक ३१.३.२०२० पर्यंत बंद करणे बाबत आदेश करित आहे.

**सदरचा आदेश हा खालील बाबीस लागू होणार नाही.**

१. **औषधे निर्माण करणा-या तसेच वैद्यकिय सेवेकरिता साहित्याची निर्मीती करणा-या कंपन्या , कारखाने, उद्योग व्यवसाय.**
२. **सॅनिटायझर, साबण, जंतूनाथक हॅन्डवॉश तयार करणा-या कंपन्या, कारखाने, उद्योग व्यवसाय.**
३. **कृषि उत्पादनावर प्रक्रिया करणा-या कंपन्या, दालमिल, ऑईल मिल, कारखाने, उद्योग व्यवसाय.**
४. **अत्यावश्यक वस्तू व सेवा पुरविणा-या कंपन्या, कारखाने, उद्योग व्यवसाय.**

सदर आदेशाद्वारे विहित करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बंधाची किंवा सदर आदेशाची अवज्ञा करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था, अथवा संघटना ही **भारतीय दंड संहिता-1860 (45) च्या कलम 188** नुसार दंडनीय/कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

सदर आदेश आज **दिनांक 23 मार्च 2019** रोजी माझी स्वाक्षरी व शिक्कयानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.**)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी -**

१. **जिल्हा पोलीस अधिक्षक**, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
२. **आयुक्त महानगर पालिका**, अकोला अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
३. **आयुक्त, अकोला महानगर पालिका अकोला /जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला / जिल्हा आरोग्य अधिकारी**, यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
४. **उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार** -------------- सर्व. यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
५. **उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
६. **उपसंचालक, औद्योगीक सुरक्षा व आरोग्य , अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
७. **सहा. कामगार आयुक्त, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
८. **व्यवस्थापक, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
९. **जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केन्द्र, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
१०. **पोलीस निरिक्षक**-------------------------- **सर्व**
११. **मुख्याधिकारी** ------------------------------------------ मार्फत **जिल्हा प्रशासन अधिकारी, अकोला,**
१२. **जिल्हा माहिती अधिकारी, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला